# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२२६
Telephone No.: 020-25621226
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २९९/२०२५

**विषय:** पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीची मुलाखत (Interview) प्रक्रिया सुरू करणेबाबत .

**संदर्भ:**
१. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १७९/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२४३६) दिनांक: ०७/०८/२०२४
२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६२/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३४५३) दिनांक: २५/१०/२०२४
३. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९५/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१८६०) दिनांक: २३/०७/२०२५
४. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २००/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१९१६) दिनांक: २८/०७/२०२५
५. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २३०/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२३०७) दिनांक: ३०/०८/२०२५
६. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २८६/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२८०५) दिनांक: ३१/१०/२०२५

पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरी आयोजित करण्याकरिता संशोधन मार्गदर्शकांकडील रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीकरिता उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये अर्ज मागविण्यात आले असून त्यामधील पात्र विद्यार्थी तसेच पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ मधील पहिल्या फेरीत निवड न झालेले पेट परीक्षा पात्र व पेट परीक्षेतून सूट मिळालेले पात्र विद्यार्थी यांना रिक्त जागांचा तपशील पाहून संशोधन केंद्र निवडण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. ६ अन्वये कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख/ मा.प्राचार्य/ मा.संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/ सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये/सर्व मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची यादी व विभागीय संशोधन समितीमधील मा. कुलगुरू नामनिर्देशित दोन प्रतिनिधी (सर्वसाधारण व मागासवर्गीय) यांची नावे महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्या BoD Login मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्यानुसार, सर्व संशोधन केंद्रांनी दि. १७ नोव्हेंबर, २०२५ ते दि. १५ डिसेंबर, २०२५ या दरम्यान मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून त्याचा अहवाल मुलाखतीनंतर तीन कार्यालयीन दिवसात पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर ऑनलाईन पद्धतीने जमा करावा.

**मुलाखत प्रक्रिया पूर्ण करताना खालील सूचनांचे पालन करावे.**

१. पीएच्.डी. प्रवेशासाठी आरक्षणासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे.

२. प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षणाची अंमलबजाबणी करावी.

अनाथ 1% व दिव्यांगांसाठी 5%, समांतर आरक्षणाप्रमाणे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन प्रक्रिया पूर्ण करावी.

SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रवेश अर्ज करताना OBC हा प्रवर्ग निवडलेला आहे तरी मुलाखती दरम्यान विद्यार्थ्याची निवड करताना त्याचा प्रवर्ग तपासूनच विद्यार्थ्यास प्रवेश द्यावा. SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

३. आरक्षणानुसारच आरक्षित जागांवर त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्याची निवड करावी तसेच आरक्षणामध्ये अदलाबदल करण्यात येऊ नये.

४. संशोधन केंद्रातील विषय निहाय विद्यार्थ्यांची निवड करताना गुणवत्ता यादीतील वरील उमेदवार खुल्या प्रवर्गातील रिक्त असणाऱ्या जागांवर निवड करावी व नंतर त्या त्या प्रवर्गनिहाय निवड करावी.

५. सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांना विभागाच्या/महाविद्यालयाच्या BoD Login मध्ये संबंधित संशोधन केंद्र निवडलेल्या विद्यार्थ्यांची अद्यावयत यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार सदर यादीतील विद्यार्थ्यांना संशोधन केंद्रांनी त्याच्या स्तरावर ई-मेल व दूरध्वनीद्वारे तसेच संशोधन केंद्र महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर मुलाखतीच्या वेळापत्रकाबाबत माहिती प्रसिद्ध करावी.

६. विभागीय संशोधन समितीमधील दोन विषय तज्ज्ञ व अध्यक्षांनी मुलाखतीसाठी एकूण १०० पैकी द्यावयाचे गुणदान ऑनलाईन पद्धतीने करावे. त्यानंतर मुलाखतीचे गुण पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर प्राप्त झाल्यानंतर लागू असल्यास पेट परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण यांचे एकत्रीकरण करून प्रणालीमार्फत गुणवत्ता यादी (Merit List) BoD Login मध्ये उपलब्ध होईल.

*पीएच.डी. विद्यार्थ्यांची निवड करताना विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९५/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१८६०) दिनांक: २३/०७/२०२५ मधील ३ (३.२) (d) (ii) अन्वये पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीमध्ये तरतूद करण्यात आली असून त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार आहे.*

७. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर BoD Login मध्ये Cosolidated Reprot व Selection Report डाऊनलोड करून सर्व सदस्य व अध्यक्षांच्या स्वाक्षरीसह अहवाल पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर ०३ कार्यालयीन दिवसात अपलोड करावेत. **सदर अहवालांची किंवा इतर कागदपत्रांची छापील प्रत शैक्षणिक प्रवेश विभागाकडे जमा करू नये.**

८. संशोधक मार्गदर्शकांकडे विद्यार्थी वर्ग करताना विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संशोधक मार्गदर्शकांसाठीच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे तसेच संशोधक विद्यार्थी व संशोधन मार्गदर्शक यांची विषय विशेषता (specialization) लक्षात घेऊन समन्वयाने संशोधन मार्गदर्शकांची नियुक्ती करावी.

९. संशोधन केंद्रांनी निवड केलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता तपासून ते प्रवेशासाठी पूर्णपणे पात्र असल्याची खात्री करावी.

a) Marks Statement of Post Graduation. (Minimum 55% marks for open category & 50% marks for reserve category)
b) Result of PET Entrance Examination 2024.

किंवा

UGC-NET (Including JRF) / UGC-CSIR NET (Including JRF) /SET / GATE (valid score), GPAT (valid score) Certificate and other similar Certificates for exemption as notified in the notification.

१०. मागासवर्गीय प्रवर्गातील/दिव्यांग/अनाथ अर्जदारांचे खालील कागदपत्रे तपासावीत.

a) Caste Certificate (for all reserved categories)
b) Non Creamy Layer Certificate (for other than SC, ST & EWS Category)
c) EWS Certificate for EWS (Maharashtra)
d) UDID Certificate (for Divyang Student)
e) Orphan Certificate issued by Divisional Deputy Commissioner, Women & Child Development Department, Government of Maharashtra

११. आरक्षित पदावर प्रवेशासाठी महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१२. विभागीय संशोधन समिती सदस्यांकडून मुलाखतीस रक्त नात्यातील कोणीही नातेवाईक नसल्याबाबत हमीपत्र संबंधित संशोधन केंद्राने भरून घ्यावे.

१३. वरील प्रक्रिया सुलभ होण्यासाठी User Manual संशोधन केंद्रांच्या Login मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना कांही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. ०२०-७१५३३६३३ अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ३०३१ )
दिनांक: १४.११.२०२५ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\PET 2024\Circulars.docx